महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/६७९८३/२०२२/२०२३ दिनांक: २२/०२/२०२३

प्रति,

मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

अपर प्रधान मुख्य ... मुंबई
आवक क्र: 5093 27/3/23
Mangrove Committee
प्रशासकीय अधिकारी ... मुख्य वनसंरक्षक

**विषय:- Destruction of Mangroves and Land Filling on Mangroves at Dhutum/Creation of parking lots. (तक्रार क्र. १९९)**

संदर्भ:- आपले कडील जा.क्र./ल.ले./कां.स./१८५/सन २०२२-२३ दिनांक ३०/०९/२०२२

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री. स्टॅलिन डी, संचालक वनशक्ती रा. नंदकुमार पवार हाऊस, दुसरा मजला, जगनाथ दर्शन समोर, एम.डी. केणी मार्ग, भांडूप गाव पूर्व, मुंबई-४०००४२ यांनी आपल्या कार्यालयाकडे ईमेलव्दारे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार उरण यांनी सादर केलेल्या अहवालान्वये, उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी त्यांचेकडील दि. ०९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर करण्यात येत आहे.

## कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री. स्टॅलिन डी, संचालक वनशक्ती रा. नंदकुमार पवार हाऊस, दुसरा मजला, जगनाथ दर्शन समोर, एम.डी. केणी मार्ग, भांडूप गाव पूर्व, मुंबई-४०००४२ |
| २. | तक्रारीचा विषय | Destruction of Mangroves and Land Filling on Mangroves at Dhutum/Creation of parking lots. |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | झिया यार्डच्या जवळ मौजे धुतुम, ता.उरण, जि. रायगड |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) श्री. बी.जी.बासांबेकर, मंडळ अधिकारी, जासई<br>२) श्री. भगवान वाघिलकर, तलाठी सजा जासई<br>३) श्री. व्ही. एम. म्हात्रे, वनपाल, परिक्षेत्र वन अधिकारी कार्यालय, उरण<br>४) श्री. आशा वाळे, वनरक्षक कांदळवन उरण, परिक्षेत्र वन अधिकारी कार्यालय, उरण |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | मौजे धुतूम, ता. उरण, जि. रायगड येथील झिया कंटेनर यार्डच्या बाजुला मौजे वालटीखार येथे उरणच्या दिशेने जाताना डाव्या बाजुला NH-४B रस्त्याला लागुन असलेल्या स.नं. १७ व १९ या साधारणत: २० एकर जमिनीत खालील नमुद व्यक्तींनी ट्रक व ट्रेलर पार्किंगसाठी डेब्रिजचा भराव करुन सदर जागेचा वापर चालु केला आहे.<br>सदर जागेवर जावुन जागेची प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, १) श्री. अमित ठाकूर २) श्री. अलंकार ठाकूर ३) श्री. अरुण ठाकूर ४) श्री. पराग ठाकूर ५) श्री. संदेश ठाकूर ६) श्री. शेखर ठाकूर ७) श्री. तुकाराम ठाकूर ८) श्री. आशिष ठाकूर वरील सर्व १ ते ८ रा. धुतूम, ता. उरण, जि. रायगड यांनी |

| | | |
|---|---|---|
| | | काही महिन्यांपुर्वी डेब्रिजचा भराव करुन कांदळवनाचा नाश केल्याचे आढळुन आले आहे. यापुर्वी डेब्रिजचा भराव करताना वरील व्यक्तींनी कांदळवनावर डेब्रिजचा भराव केलेला असल्यामुळे कांदळवनाचा नाश/ऱ्हास झालेला आहे. |
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | आजरोजी प्रत्यक्ष स्थळपाहणीवळी कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येते. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | F.I.R. No. ०२७६/२०२२ दि. २८/०९/२०२२ अन्वये उरण पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | १) श्री. अमित ठाकूर २) श्री. अलंकार ठाकूर ३) श्री. अरुण ठाकूर ४) श्री. पराग ठाकूर ५) श्री. संदेश ठाकूर ६) श्री. शेखर ठाकूर ७) श्री. तुकाराम ठाकूर ८) श्री. आशिष ठाकूर वरील सर्व १ ते ८ रा. धुतूम, ता. उरण, जि. रायगड |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची आहे.

20/2/23

(डॉ.पद्मश्री बैनाडे)
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

२१४२६-१९९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
वनविभाग
**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**
**यांचे कार्यालय**

दूरध्वनीक्र.022-25220097
EmailId:dfommcu@gmail.com

ब- ६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०० ०२४

जा.क्र.कक्ष-9/जमिन/ ३१९९ /सन 2022-23

दिनांक. ०९ /०२ /2023.

प्रति,
सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय** : Destruction of Mangroves and Land filling on Mangroves at Dhutum/Creation of parking lots (तक्रार क्र. १९९)

**संदर्भ** : १. आपलेकडील पत्र क्र. ल.ले/कां.समिती/१८५,दिनांक.३०/०९/२०२२.
२. वनक्षेत्रपाल नवी मुंबई यांच्याकडील पत्र क्र. न.मुं.का.सं./४७४, दिनांक.१०/११/२०२२.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये तक्रारदार श्री. स्टॅलिन डी, संचालक, वनशक्ती यांनी गाव धुतूम ता. उरण जि. रायगड येथे २० एकरपेक्षा जास्त कांदळवनाच्या क्षेत्रावर भरणी तसेच कांदळवनाची तोडणी झाल्याचे दिसून आल्याची तक्रार आपलेमार्फत या कार्यालयात प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीचे अवलोकन केले असता तक्रारीत नमुद क्षेत्र या विभागाच्या कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे सदरची तक्रार या विभागाकडून निकाली काढण्यात यावी. ही विनंती.

8/2/23

(एम.आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी – मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी – उपवनसंरक्षक (प्रा.), अलिबाग यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यहवाहीसाठी सादर.
2/- त्यांनी सदर तक्रारी अर्जावर आपले विभागामार्फत कार्यवाही करुन तसा अहवाल परस्पर . सदस्य सचिव, राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती, तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडे सादर करावा.
प्रतिलिपी - सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 563
दिनांक 10/02/2023
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

Mangrove comm.